




पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष
स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com








■ वर्ष ७६ वे/अंक २५७ वा ■ ■ अमरावती, बुधवार दिनांक ६ मे २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर १६ वैशाख १९४८ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■







# पराभूत झालेले नाही, मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देणार नाही, राजभवनात जाणार नाही



## ममता बॅनर्जींचा निवडणूक आयुक्तांवर हल्लाबोल

कोलकाता दि. ५ : पश्चिम बंगालच्या मावळत्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी तृणमूल काँग्रेसच्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर आज पत्रकार परिष घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी राजीनामा देणार नसल्याचं म्हटलं. याशिवाय ममता बॅनर्जींनी निवडणूक निकालानंतर कोणत्या कोणत्या नेत्यांचे फोन आले याची नावं पत्रकार परिषदेत सांगितली. पश्चिम बंगालमधील २९३ पैकी ८० जागांवर ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसचा विजय झाला. ममता बॅनर्जी यांनी सोनिया गांधी, राहुल गांधी, अरविंद केजरीवाल, उद्धव ठाकरे, अखिलेश यादव, तेजस्वी यादव आणि हेमंत सोरेन यांचा फोन आल्याचं सांगितलं.

ममता बॅनर्जी पुढं म्हणाल्या की इंडिया आघाडीतील सर्व पक्षांकडून ते पूर्णपणे आमच्या सोबत असल्याचं सांगितलं. आमची एकता पुढील काळात आणखी भक्कम होईल, असं त्या म्हणाल्या. अखिलेश यादव यांनी आज बंगालमध्ये येण्यासंदर्भात विनंती केली होती. त्यांना उद्या यावं असं सांगितल्याचं ममता बॅनर्जी म्हणाल्या. एका पाठोपाठ एक असे सर्व जण येतील. माझं लक्ष्य स्पष्ट आहे. एका लहान व्यक्तीप्रमाणं मी इंडिया आघाडीचा टीम मजबूत करणार आहे. आता माझ्याकडे कोणतंही पद नाही, आता मी सर्वसामान्य आहे, त्यामुळं तुम्ही आता मला पदाचा वापर करताय असं म्हणून शकत नाही, आता मी मुक्त आहे. मी माझं सर्व आयुष्य लोकांच्या सेवेसाठी दिलं आहे. गेल्या १५ वर्षात पेन्शनमधून एक रुपया घेतला नाही, पगाराचा एक पैसा देखील घेतलो नाही. मी आता मुक्त असून आता मला काही काम करायचं आहे, मी ते करणार आहे, असं ममता बॅनर्जींनी म्हटलं.

ममता बॅनर्जी *(उर्वरित पान २ वर)*

## लैंगिक अत्याचार प्रकरणात महाराष्ट्रात नवा कायदा

मुंबई दि.५ : पुण्यातील भोर येथील नसरापूरमध्ये अत्याचार करून चिमुकलीची हत्या केल्याची घटना घडली होती. या प्रकरणामुळे राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणामधील प्रमुख आरोपी भीमराव कांबळे हा यापूर्वीच लैंगिक अत्याचाराच्या दोन प्रकरणांमध्ये आरोपी आहे. कायदेशीर प्रक्रियेनंतर तो मुक्तपणे फिरत असून त्यामुळेच हा गुन्हा करण्याची हिम्मत झाली,असा आरोप केला जातोय. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपींना यापुढे पॅरोल मिळणार नाही, असा कायदा करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यातील एक महत्त्वाची निर्णय म्हणजे, आरोपींना पॅरोलबाबत घेण्यात आला. बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा कायदा करण्यासंदर्भाती निर्देश दिलेत. फडणवीस सरकार कायद्यात बदल करण्याच्या तयारीत आहे.

लैंगिक प्रकरणात ८० ते ९० टक्के आरोपी हे त्याच गुन्ह्यात अटक होऊन पॅरोलवर सुटलेले असतात. त्या काळात *(उर्वरित पान २ वर)*

## मंत्रिमंडळ बैठकीत आदिवासी बांधवांच्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्वपूर्ण निर्णय

मुंबई दि. ५ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (५ मे) राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत कही महत्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये, आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठीचा निर्णय, सोलापूरच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये या शैक्षणिक वर्षापासून (सन २०२६-२७) पदवीस्तराचे तीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरु करण्यास मंजुरी आणि श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय महाराष्ट्र




शासनास हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना फायहा होणार असून आदिवासी मुलांच्या शैक्षणिक प्रगतीला गती मिळणार आहे.

### आदिवासी विकास विभाग

आदिवासी बांधवांच्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्वपूर्ण निर्णय. स्वयंसेवी संस्थाच्या पाच प्राथमिक व १९ माध्यमिक अनुदानित आश्रमाशाळांची श्रेणीवाढ. प्राथमिकमधून माध्यमिक आणि माध्यमिकमधून कनिष्ठ महाविद्यालय अशी श्रेणीवाढ, त्यासाठी आवश्यक पदनिर्मिती व आवश्यक खर्चाच्या तरतूदीस मंजुरी. डोंगराळ, दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या मुलांचे शिक्षण गतीमान होणार.

### सोलापूरसाठी महत्वाचा निर्णय

सोलापूरच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये या शैक्षणिक वर्षापासून (सन २०२६-२७) पदवीस्तराचे तीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरु करण्यास मंजुरी. सोलापूर आणि आजुबाजुच्या परिसरातील अभियांत्रिकी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या होतकरूंच्या दृष्टीने हिताचा निर्णय. प्रत्येकी साठ प्रवेश क्षमतेचे एआय अँण्ड मशिन लर्निंग, कॉम्प्युटर सायन्स अँण्ड *(उर्वरित पान २ वर)*

## तामिळनाडूत विजय यांची टीव्हीके विधीमंडळ पक्षनेते म्हणून निवड



चेन्नई दि. ५ : तामिळनाडू विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. या राज्याची सत्ता सुमारे साठ वर्षांनंतर डीएमके आणि एआयएडीएमके यांच्या हातातून बाहेर पडून तिसऱ्या पक्षाकडे गेली आहे. यावेळी तमिळनाडूत फक्त सत्तांतर झाले नसून अभिनेता ते नेता बनलेले थलापती विजय यांच्या राजकीय उदयाने तामिळ राजकारणाला नवीन चेहरा मिळाला आहे. विजय यांची टीव्हीके विधिमंडळ पक्षनेते म्हणून निवड झाली असून, त्यामुळे ते मुख्यमंत्री बनणार हे जवळपास निश्चित झाले आहे.

२०२६ च्या विधानसभा निवडणुकीत *(उर्वरित पान २ वर)*

## माहोल....




दीदी झालमुडी खाऊन घ्या...थोडे बरे वाटेल!

## तापमान

| | | |
|---|---|---|
| अमरावती | - | ४२.८ |
| अकोला | - | ४२.५ |
| बुलढाणा | - | ३८.७ |
| ब्रह्मपुरी | - | ४२.२ |
| चंद्रपूर | - | ४२.२ |
| गडचिरोली | - | ४२.६ |
| गोंदिया | - | ३८.० |
| नागपूर | - | ४०.८ |
| वर्धा | - | ४३.५ |
| वाशिम | - | ४२.४ |
| यवतमाळ | - | ४१.८ |
| भंडारा | - | ३९.० |

## ५ राज्यांच्या निवडणुका होताच मोदी सरकारने घेतले महत्वाचे निर्णय

नवी दिल्ली दि. ५ : ५ राज्यांच्या निवडणुका होताच मोदी सरकारच्या कॅबिनेटने निर्णयांचा धडाका लावला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली कॅबिनेट बैठकीत अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले. कृषी, ट्रेक्नोलॉजी आणि मेक इन इंडियाशी संबंधित अनेक निर्णय घेण्यात आले.



सरकारने कृषी क्षेत्र मजबूत करण्यासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी १ लाख कोटींची घोषणा केली. तसेच कापूस उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात येणार आहेत. कापसाच्या गुणवत्तेत बदल झाल्यास जागतिक बाजारात मागणी वाढेल, या उद्देशाने सरकारने निर्णय घेतले आहेत.

टेक्नॉलॉजी क्षेत्रात भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी उत्तर प्रदेशातील जेवरमध्ये सेमीकंडक्टर युनीट लावण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. सेमीकंडक्टर मोबाईलपासून कारपर्यंत फायदेशीर ठरणार आहे. यामुळे भारताकडून आयात कमी होईल. देशात चिप मॅन्युफॅक्चरिंगला प्रोत्साहन मिळेल. रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील.

सरकारने जयपूर मेट्रो फेज -२ सारख्या मोठ्या प्रकल्पाला देखील मंजुरी दिली आहे. यामुळे शहरातील सार्वजनिक वाहतूक *(उर्वरित पान २ वर)*

## मराठवाडा अन् विदर्भात अवकाळीने गारवा गारांचा पाऊस, शेतकऱ्यांची पिके धोक्यात



मुंबई दि. ५ : राज्यात उष्णतेमुळे नागरिक त्रस्त झाले असून ऊन्हापासून बचावासाठी वेगवेगळे पर्याय अवलंबत आहेत. तसेच, भरदुपारी घराबाहेर जाणेही टाळले जात आहे. एकीकडे कडक उन्हामुळे अंगाची लाहीलाही होत असताना दुसरीकडे मराठवाडा आणि विदर्भात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. काही जिल्ह्यात जोरदार वाऱ्यासह गारांचा पाऊस पडल्याचंही दिसून आलं. जालना, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, नंदूरबार जिल्ह्यात अवकाळीमुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. तर, काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या पिकांचं नुकसान झालंय.

जालना तालुक्यातील रामनगर परिसरात वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावल्याने उकाड्यापासून हैराण झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. जालना *(उर्वरित पान २ वर)*

## जाहिर सूचना

माझे पक्षकार छुगाराम लोहारीमल खत्री (एच. यु. एफ.) रा. देशना नगर, शंकर नगर रोड, अमरावती यांनी खालील वर्णन केलेल्या मालमत्तेची खरेदी मिळण्याकरीता विनिर्दिष्ट पालनाकरीता विशेष दिवाणी मुकादम क्र. १७७/२०२६ सुलक्षणी नंदलाल पहेलाजानी व दिनेश नंदलाल पहेलाजानी व्दारा 'युवराज शुटिंग अँड शर्टींग' जवाहर रोड, अमरावती यांच्या विरुद्ध केला असून, सदर्हु दाव्यात मा. १८ वे दिवाणी न्यायाधिश वरिष्ट स्तर, अमरावती यांनी खालील वर्णन केलेल्या मालमत्तेत कोणताही त्रैयस्थ हक्क निर्माण करु नये असे आदेश दि. ५/५/२०२६ रोजी पारीत केले आहे.

सदर्हु मालमत्तेचे वर्णन

मौजे पेठ अमरावती, प्रगणे बडनेरा, ता. जि. अमरावती, अमरावती महानगरपालिकेच्या हद्दीत व दुय्यम निबंधक अमरावती यांच्या कार्यक्षेत्रात जवाहर रोड, अमरावती येथे स्थित शिट क्र. ६८-डी, पैकी नझुल प्लॉट क्र. ३६ एकुण क्षेत्रफळ ५६७१ चौ.फुट यापैकी ४५० चौ. फुट ज्याची चर्तु:सिमा येणे प्रमाणे

पुर्वेस - आराधना चे दुकान, पश्चिमेस - राजधानीच्या ताब्यात असलेली दुकान, उत्तरेस - आराधना यांचा परिसर, दक्षिणेस - जवाहर रोड.

तरी सदर्हु मालमत्तेबद्दल कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये व तसे केल्यास ते न्यायालयाच्या आदेशाचा भंग होवून न्यायालयाचा अवमान (Contempt of Court) होवून न्यायालयीन आदेशाचा आदेशिका ३९ नियम २ - ए अंतर्गत कार्यवाही केल्या जाईल. तसेच सदर्हु व्यवहार हा संपत्ती हस्तांतरण कायदा, १८८२ च्या कलम ५२ नुसार प्रलंबित वाद (Lis pendense) च्या तत्वाचे सुद्धा अधीन राहील व त्यांच्या विरुद्ध न्यायालयीन कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दि. ४/५/२०२६

ॲड. ए.एम. जैन
मांगीलाल प्लॉट, कॅम्प, अमरावती






## एसबीआयच्या कर्मचाऱ्यांचा संप बँक सलग चार दिवस बंद राहणार

मुंबई दि. ५ : या महिन्याच्या अखेरीस स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बँकिंग सेवांवर परिणाम होऊ शकतो. कर्मचारी संघटनांनी दोन दिवसांच्या देशव्यापी संपाची घोषणा केली आहे, ज्यामुळे चार दिवस शाखांचे कामकाज विस्कळीत होऊ शकते. ऑल इंडिया स्टेट बँक ऑफ इंडिया स्टाफ फेडरेशनने संपाची घोषणा केली आहे. २३ मे हा चौथा शनिवार आणि २४ मे हा रविवार असल्याने, एसबीआयच्या बहुतेक शाखा सलग चार दिवस बंद राहण्याची शक्यता आहे. *(पान २ वर)*





